# ❋ निवेदन ❋

## पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

समाजात दिवसेंदिवस वाढणारी बेरोजगारीची समस्या दुर करण्याच्या दृष्टीकोनातून मा. विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मा. जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, चेअरमन, स. म. शं. मोहिते-पाटील सह. सा. कारखाना लि., शंकरनगर-अकलूज यांचे मार्गदशनाखाली व मा. रणजितसिंह विजयसिंह मोहिते-पाटील, आमदार, विधान परिषद, महाराष्ट्र राज्य यांचे प्राप्त सुचनेप्रमाणे सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज व महाराष्ट्र शासन, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग, सोलापूर यांचे संयुक्त विद्यमाने **शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी "सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज, जिल्हा सोलापूर"** या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार व स्वयंरोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. या मेळाव्यामध्ये सोलापूर, पुणे, मुंबई (ठाणे) इत्यादी ठिकाणाहून विविध औद्योगीक क्षेत्रातील नामांकित कंपन्यांनी सहभाग दर्शविलेला असून त्यांच्याकडून एकूण 2000 व त्याहून अधिक रिक्त पदे उपलब्ध असल्याचे कळविण्यात आलेले आहे.

ही सर्व रिक्तपदे किमान **10 वी (SSC), 12 वी (HSC), आय. टी. आय (ITI), बी. ए. (B.A.), बी. कॉम. (B.Com), बी. एससी. (B.Sc.), डिप्लोमा इंजिनिअरींग, डिग्री इंजिनिअरींग (B.E., B.Tech.), BCA, BCS, BBA, बी. एससी. नर्सिंग GNM/ANM/DMLT/MLT/PGDMLT किंवा Any Graduate (पदवी), एम. ए. (M.A.), एम. कॉम. (M.Com), एम. एससी. (M.Sc.), MCA, MCS, MBA, Any Post Graduate (पदव्युत्तर पदवी)** इत्यादी प्रकारच्या विविध शैक्षणिक पात्रताधारक उमेदवारांसाठी असून सोलापूर जिल्ह्यातील जास्तीत जास्त नोकरीइच्छुक सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींना या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून विविध संधी उपलब्ध करुन देण्यात येत आहेत.

नोकरीइच्छुक सुशिक्षित बेरोजगार युवक, युवतींनी आवश्यक कागदपत्रांसह **शुक्रवार दिनांक १० फेब्रुवारी २०२३ रोजी सकाळी ठिक १० वाजता "सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँन्ड रिसर्च, शंकरनगर-अकलूज, जिल्हा सोलापूर"** या अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये मुलाखतीसाठी उपस्थित रहावे.

याबाबत काही अडचण आल्यास कार्यालयाच्या ०२१७-२९५०९५६ या दूरध्वनीवर अथवा प्रत्यक्ष भेटीद्वारे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, नॉर्थकोट, पार्क चौक, सोलापूर येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात येत आहे.

अध्यक्ष

शंकरराव मोहिते पाटील चॅरिटेबल हॉस्पिटल ट्रस्ट,

शंकरनगर-अकलूज